**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक 23/01/2020 (गुरूवार)**
**(सकाळ)**

---

## चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर नवदुर्गा रेस्टॉरेन्टचे बजुला मौदा येथे दिनांक 22/01/2020 चे 15:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीनिवास क्रिष्णामुर्ती चिन्तलपुडी, वय 46 वर्ष, रा. निमखेडा यांनी बॅक ऑफ इंडीया मौदाच्या खात्यातुन 1,25,000/–रू. काढले. यानंतर फिर्यादीने त्यातले 3,000/–रू. काहि सामान घ्यायला काढले व घरी जायला निघाले असता त्यांच्या जवळ एक 17 ते 18 वर्षाचा मुलगा आला व म्हणाला की, ''तुमच्या पॅन्ट खराब झाला त्याची वास येत आहे'' असे म्हणाला असता फिर्यादीने गाडी थांबवली व 1,22,000/–रु असलेली बॅग मोटरसायकला हॅन्डल ला लटकवली व पॅन्ट धुवायला गेले असता अज्ञात आरोपीने गाडीला लटकवलेली बॅग ज्यामध्ये असलेले 1,22,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे 9464007720 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर वर्धा फाटा येथे दिनांक 22/01/2020 चे 00.10 वा. दरम्यान एमच–40/वाय–9927 क्रमांकाचा टिप्पर गाडीचा चालक आरोपी नामे– 1) चंद्रशेखर विष्णुजी टेकाम, वय 32 वर्ष, रा. नागलवाडी ता. सावनेर जि. नागपुर, 2) दिपक गंगाधर धुर्वे, वय 29 वर्ष, रा. नागलवाडी ता.सावनेर जि. नागपुर, 3) प्रशांत वासुदेवराव वाकोडे, वय 36 वर्ष, रा. सावनेर ता. नागपुर व 4) रमेश नामदेवराव रेवतकर, वय 50 वर्ष, रा. कोंढाळी ता.काटोल जि.नागपुर हे त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 12,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 20,12,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई गौरव मोकले यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बांबल 9767436071 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 22 कि. मी. अंतरावर मौजा खापरी राजा शिवार मुसळे पेट्रोलपंप येथे दिनांक 21/01/2020 चे 21.00 वा. दरम्यान एमच–40/बीजी–9344 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– रंजित सुरेश उईके, वय 22 वर्ष, रा. डोंगरगाव हा त्याचा ट्रकचा डाला वर करत होता. दरम्यान ट्रकचा डाला हा पेट्रोल पंपाचे वरून जाणारा ईलेक्ट्रीक विद्युत लाईनच्या तारला लागल्याने ट्रकमध्ये करंट येवुन ट्रकच्या उजव्या भागाच्या मागील चाकाजवळ उभा असलेला रितीक अरून बन्सोड(मृतक), वय 18 वर्ष याने ट्रकला स्पर्श केल्याने त्याला जोरदार विद्युत करंटचा शॉक लागुन त्याचा मृत्यू झाला. अरोपी ट्रक चालकाच्या हलगर्जीपना व बेजबाबदार पनामुळे ट्रक चालक हा मृतकाचे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनील जालंधर परतेकी वय 37 वर्ष, रा. सुरगांव ता. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. पंजाबराव परघणे हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर मौजा नागपुर उमरेड रोड गावाजवळ येथे दिनांक 20/01/2020 चे 18.30 वा. दरम्यान एमच–29/आर–3370 क्रमांकाचा ईनोवाचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन अज्ञात पुरूष वय अंदाजे 35 वर्ष यास जबर धडक दिली. या अपघातात अज्ञात पुरूष इसम हा जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सर तर्फे परी पोउपनि श्री. प्रशांत खोब्रागडे, पो. स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134(अ)(ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. राजेश पाटील 90499899341 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर